मंत्रालयीन सेवा
जनहितार्थ सर्वदा

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४००० ३२**
**दुरध्वनी क्रमांक** : ०२२-२२८८५९८४ **ई मेल** : **desk२c-cmtd@mah.gov.in**

---

**क्रमांकः- जिमस १२२५/प्र.क्र.२९३/२-स** **दिनांक - ९ मार्च, २०२६**

**प्रति,**

**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य**
**पुणे**

**विषय:- बँकिंग कायदा (सुधारणा) अधिनियम, २०२५ ची अंमलबजावणी करणेबाबत.**

**संदर्भ:**-१. बँकिंग सुधारणा अधिनियम, २०२५, अर्थमंत्रालय, केंद्र सरकार यांचे व्हेरिफिकेशन दि. ०१.०८.२०२५
२. शासनपत्र दि. १०.०२.२०२६
३. भारतीय रिझर्व बँकेचे क्र.DOR.HGG.No.S८७०१/१८.०५.००२/२०२५-२६, दि. १८.०२.२०२६

बँकींग कायदा (सुधारणा) अधिनियम, २०२५ मध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ज्या संचालकांनी १० वर्षापेक्षा जास्त कालावधी संचालक म्हणून कार्यकाळ पुर्ण केला असेल, असे संचालक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पुढील निवडणुकीसाठी अपात्र असतील. तसेच ज्या संचालकांनी १० वर्षाचा कार्यकाळ संचालक म्हणून पुर्ण केला असेल त्यानंतर त्यांनाही संचालक म्हणून अपात्र करण्यात यावे, असे अधिनियमात नमूद असल्याचे विभागाचे मत/धारणा असून सदर धारणा पक्की करण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेस शासनाच्या दि. १०.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आली होती.

२. सदर विनंतीस अनुसरुन भारतीय रिझर्व बँकेने खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

In this connection, it is advised that in terms of section 10A (2A) (i) read with section 56 of the Banking Regulation Act, 1949 any director of a cooperative bank who has completed a continuous tenure of 10 years on or after August 1, 2025 [i.e., the date on which Section 4 of the Banking Laws (Amendment) Act, 2025, came into force] shall be ineligible to continue in office. Accordingly, we concur with the views expressed in your aforesaid letter.

३.	भारतीय रिझर्व बँकेने दि. १८.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये विभागाच्या मत/ धारणेस उपरोक्तप्रमाणे सहमती दर्शविली आहे.

सदर तरतुदीच्या अनुषंगाने सहकार विभागाचे सर्व क्षेत्रीय अधिकारी तसेच सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे संचालक यांना सदर तरतूदीची तात्काळ अंमलबजावणी करण्यासाठी आपल्या स्तरावरुन आवश्यक ते निर्देश देण्यात यावेत.

सुवे अमृते ०६/०३/२०२६

**(सुधीर विष्णू अमृते)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत-** निवडनस्ती